# मॅकडोनाल्ड्सतर्फे गोव्यातील दुसऱ्या रेस्टॉरंटची घोषणा

▶ कळंगुट येथे २७०० चौ. फूट जागेत सुरू होणार रेस्टॉरंट

▶ ४५ स्थानिकांना मिळणार रोजगार संधी

पणजी, दि. ८ (पत्रक) :

वेस्टलाइफ डेव्हलपमेंट लिमिटेड या पश्चिम आणि दक्षिण भारतातील मॅकडोनाल्ड्स रेस्टॉरंटच्या मुख्य फ्रेंचाइझी कंपनीने गोव्यातील त्यांच्या दुसऱ्या रेस्टॉरंटच्या सुरुवातीची घोषणा केली. पर्वरी येथील मॉल दी गोवा इथे जून २०१६ मध्ये मॅगडोनाल्ड्सचे गोव्यातील पहिले रेस्टॉरंट सुरू झाले. या रेस्टॉरंटमध्ये मॅकडोनाल्ड्सचे यशस्वी ब्रँड्स जसे की मॅक कॅफे ही इन-हाउस कॉफी स्टाइल चेन आणि नव्याने सुरू झालेली मॅक ब्रेकफास्ट ही सेवा उपलब्ध असेल.

हे हाय स्ट्रीट रेस्टॉरंट स्वतंत्र संकुलात असणार आहे. या २७०० चौ. फूट जागेत ११६ ग्राहकांना बसता येईल एवढी जागा असेल. आधुनिक डिझाइन्स, सर्वोत्कृष्ट सुविधा आणि जगभरात मॅकडोनाल्ड्सचे वेगळेपण जपणाऱ्या सेवा या रेस्टॉरंटमध्येही आहेतच. ग्राहकांना इथे सकाळी ११ ते रात्री ११ या वेळेत विविध प्रकारच्या पदार्थांचा आनंद घेता येईल. शिवाय मोफत वाय-फाय इंटरनेट आणि कुटुंब-मित्रपरिवाला साजेशा सुविधांचाही लाभ घेता येईल. इथे १२ गाड्यांसाठी स्वतंत्र पार्किंगतीही सोय आहे.

या नव्या रेस्टॉरंटमध्ये ग्राहकांना नव्याने दाखल झालेल्या मॅकब्रेकफास्ट मेनूचा आनंद घेता येईल. डोसा मसाला ब्रिओशी, हॅशब्राऊन ब्रिओशी किंवा वॅफल्स, मॅक कॅफेमध्ये खास प्रशिक्षित बरिस्ताजच्या हातची कॉफी आणि पेये यांचा आनंद घेता येईल किंवा मॅकआलू टिक्की, मॅकवेजी, मॅकस्पाइसी पनीर शिवाय मॅकचिकन, चिकनमॅकग्रिल आणि मॅकस्पाइसी चिकन अशा मांसाहारी पदार्थांचा आस्वाद घेता येईल. बिग स्पायसी पनीर, चिकन रॅप्स, विविध प्रकारचे सॉसी रॅप्स आणि प्रसिद्ध मॅकडोनाल्ड फ्रेंच फ्राइस तुमचा दिवस आनंददायी बनविण्यासाठी सज्ज आहेत.

या रेस्टॉरंटमध्ये ४५ स्थानिकांना रोजगार उपलब्ध झाला आहे.